# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत,**
**दुसरा व चौथा मजला (सर्व्हे नं. 832-ए),शिवाजीनगर,पुणे-411004**
**दूरध्वनी क्र-:** 020-29709396 वेबसाईट-:www. mscepune. in **ई-मेल:** mscepune@gmail.com

जा.क्र.मरापप/स्वी.सहा/2024/131/दि.30/10/2024

**प्रति.**

**अध्यक्ष,**

महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई.

**विषय** - सर्व टंकलेखन संस्थांमध्ये सीसीटीव्ही व बायोमेट्रिक मशीन या सुरक्षाविषयक उपाययोजनांची अंमलबजावणी करणेबाबत..

**संदर्भ** - 1).या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मरापप/स्वी.सहा/2024/114/ दि.24/10/2024.
2).अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य टंकलेखन,लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना,मुंबई यांचे दि.9/10/2024 चे पत्र.

संदर्भीय पत्र क्र.1 अन्वये या कार्यालयाकडून सुरक्षितता व अनाधिकृत प्रवेशांना प्रतिबंध घालण्यासाठी CCTV व बायोमेट्रिक मशीन(With Face Recognition) ही उपकरणे राज्यातील सर्व टंकलेखन संस्थांमध्ये बसवणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. या परिपत्रकास अनुसरुन अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य टंकलेखन,लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना,मुंबई यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले होते. संघटनेने उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

**मुद्दा क्र.**1. बायोमेट्रिक हजेरी ही किमान 50 विद्यार्थ्यांपासून सक्तीची करावी.
- मुळातच संगणक टंकलेखनाच्या दोन परीक्षा वर्षभरातून होत असून सुरक्षा उपकरणे लावण्यासाठी एका सत्रामध्ये 25 पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित असल्यास म्हणजेच पर्यायाने वर्षभरातून 50 पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास, अशा संस्थाचालकांना सहा महिन्यांची मुदतवाढ दिलेली असून 31 मार्च, 2025 पर्यंत CCTV व बायोमेट्रिक मशीन लावण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.जून,2024 च्या परीक्षेमध्ये/ सत्रामध्ये 25 पेक्षा कमी/जास्त विद्यार्थी प्रवेशित केलेल्या संस्थाचालकांची यादी वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे व सर्व जिल्हा प्रतिनिधींना देखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्र.**2. बायोमेट्रिक हजेरी ही परीक्षा परिषदेने दरम्हा २५ ते ३० तारखेपर्यंत घ्यावी.
- पंधरा दिवसांचा कालावधी पर्याप्त वाटतो, त्यापेक्षा जास्त कालावधी दिल्यास अनधिकृत व बोगस प्रवेशांना आळा घालता येणार नाही.तसेही 15 दिवसांच्या हजेरीपटाची पीडीएफ(PDF) नियमितपणे अपलोड करणे फारसे अवघड काम नसून,सदर रिपोर्ट अपलोड करण्यासाठी पाच दिवसांचा कालावधी परिपत्रकामध्येच नमूद करण्यात आलेला आहे.

**मुद्दा क्र.**3. बायोमेट्रिक हजेरी विद्यार्थ्यास 12 तासातून कधीही हजेरी देता येईल, त्यात फक्त इनकमिंग हजेरी घेण्यात यावी..
- सर्वसाधारणपणे बायोमेट्रिक मशीन ज्या-ज्या ठिकाणी लावलेले आहे, त्या ठिकाणी आत येताना व बाहेर जाताना अशा दोन्ही प्रकारच्या हजेरी नोंदविण्यासाठीच सदर मशीन बनविण्यात आलेले आहे. त्यामुळे केवळ इनकमिंग हजेरी घ्यावी ही मागणी कायदेशीर तरतूद लक्षात घेता मान्य करता येणार नाही. विद्यार्थ्यांचे सत्र

30/10

प्रवेश घेतानाच ठरलेले असते. यामध्ये शक्यतो बदल संभवत नसतो. तथापी अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर विद्यार्थ्याला ठरवून दिलेल्या सत्रामध्ये हजर राहता आले नाही, तर त्याला संस्थेमध्ये इतर वेळी हजर राहून प्रशिक्षण घेता येऊ शकेल व अशावेळी त्याची बदललेल्या वेळेतील बायोमेट्रिक मशीनवरील हजेरीदेखील ग्राह्य धरण्यात येईल.अशा तात्पुरत्या स्वरूपात दैनंदिन सत्र बदल केलेल्या विद्यार्थ्यांचे वेगळ्याने रजिस्टर ठेवून त्यावर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक राहील.

**मुद्दा क्र.**4. शिक्षणाधिकाऱ्यांनी संस्थांच्या दर दोन महिन्याला तपासणी करणेबाबतचा मुद्दा वगळण्यात यावा, कारण त्यातून संस्थाचालकांची पिळवणूक होऊ शकते.

- मुळातच नियमावलीमध्ये जिल्हास्तरावरील संस्थाचालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मागील कित्येक वर्षांपासून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. नियमावली मध्ये देखील दर दोन महिन्यांनी शिक्षणाधिकारी यांनी संस्थांची तपासणी नियमितपणे करावी असे निर्देश दिलेले असल्यामुळे संस्थाचालकांची यामुळे पिळवणूक होते हा मुद्दा योग्य वाटत नाही,त्यामुळे हा मुद्दा मान्य करता येणार नाही.

**मुद्दा क्र.**5. बायोमेट्रिक हजेरीसाठी आपण 31 ऑक्टोबर 2024 ही तारीख ठरवून दिली. त्याऐवजी टप्याटप्याने मुदत वाढ देऊन 1 एप्रिल 2025 पासून सक्तीची करावी.

-टंकलेखनाचे दुसरे सत्र 1 ऑक्टोबर,2024 पासून सुरु झालेले आहे.राज्यभरातील संस्थाचालकांनी सीसीटीव्ही आणि बायोमेट्रिक मशीनचे डेमो आयोजित करून अनेकांनी खरेदी देखील केलेले आहेत.अशा वेळी संघटनेने 1एप्रिल,2025 पर्यंतची मागितलेली मुदतवाढ वास्तवास धरुन नाही.क्षेत्रीय स्तरावरील उपलब्ध माहितीनुसार साधारणपणे चांगल्या व किफायतशीर बायोमेट्रिक मशीनची किंमत रु.4500 ते 6000/- असुन Wifi आधारित CCTV ची किंमत देखील रु.3500/- (एका संगणक लॅब साठी) एवढी अत्यल्प असल्याचे आढळून आले आहे. काही संस्थाचालकांनी उपकरणांची ऑर्डर दिलेली असली,तरी प्रत्यक्षात मात्र Installation साठी काही किरकोळ अवधि(5 ते 7 दिवस) लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिवाळी सण लक्षात घेता सुरक्षा उपकरणे लावण्यास मुदतवाढ देण्यात यावी ही संघटनेची मागणी असली तरी,सध्यस्थितीत **विधानसभेच्या आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू असून, आचारसंहितेच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ/सवलत देता येणार नाही.**

टंकलेखन संस्थेने बायोमेट्रिक मशीन (with Face Recognition) व सीसीटीव्ही उपकरण बसवले किंवा नाही? याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्यांच्या स्तरावर **दि.14 नोव्हेंबर,2024** रोजी जिल्ह्यातील सर्व संस्थाचालकांची बैठक घेऊन बायोमेट्रिक मशीन व सीसीटीव्ही ज्या संस्थाचालकांनी बसवले नाहीत, त्यांचे विरूद्ध शिस्तभंगाच्या कारवाईचे प्रस्ताव **दि.**17 **नोव्हेंबर**,2024 पर्यंत सादर करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.त्याची परीक्षा परिषदेकडून गांभीर्याने दखल घेऊन परिपत्रकाच्या अंमलबजावणीमध्ये कसूर करणाऱ्या संस्थांविरुद्ध पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याचे परीक्षा परिषदेच्या विचाराधीन आहे :-

i).सदर उपकरणे आपल्या संस्थांमध्ये बसविण्याच्या तारखेपर्यंत प्रतिदिन ₹.50/- या दराने दंडात्मक कारवाई प्रस्तावित करणे.

ii).विद्यार्थी हितासाठी संस्थाचालकांना प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु.500/- सामुग्री शुल्क वसूल करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.परंतु यामध्ये संस्थाचालकाकडून कसूर होत असल्याने डिसेंबर,2024 संगणक टंकलेखन परीक्षेमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण सामुग्री शुल्क दंड स्वरूपात वसूल करणे.

30/10

iii).ज्या संस्था परिपत्रकांमधील सूचनांचे व मुदतीचे पालन करणार नाहीत,अशा संस्थांमधील विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवून नंतर परिस्थितीनुरूप रद्द करणे व त्याची जबाबदारी संबंधित संस्थाचालकावर निश्चित करणे.

iv).संबंधीत संस्थेचा संस्था कोड/मान्यता रद्द करणे.

**मुद्दा क्र.**6. लघुलेखन प्रशिक्षणासाठी बायोमेट्रिक हजेरी असावी, मात्र त्यामधून शासकीय, निमशासकीय नोकरी करणार्या विद्यार्थ्यांना सवलत मिळावी,कारण अनेक विद्यार्थी ऑनलाइन प्रशिक्षण पूर्ण करत आहे.

- प्रामुख्याने विद्यार्थ्याने प्रशिक्षणासाठी संस्थेमध्ये हजर राहून नियमानुसार आवश्यक असलेले प्रशिक्षण घ्यावे, या हेतूनेच बायोमेट्रिक मशीन द्वारे हजेरी बंधनकारक करण्यात आलेली आहे.लघुलेखनाचा विद्यार्थी असो किंवा संगणक टंकलेखनाचा असो, विद्यार्थ्याने तांत्रिक कौशल्य प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीकोनातून प्रशिक्षण संस्थेमध्ये हजर राहणे अत्यावश्यक आहे.शासकीय, निमशासकीय नोकरी करणारे विद्यार्थ्यांना देखील आपल्या कार्यालयाची वेळ तपासून, दिवसभरामध्ये कधीही एका तासाचे प्रशिक्षण घेता येऊ शकते. जर एखाद्या विद्यार्थ्याची टंकलेखन प्रशिक्षणादरम्यान नियमित परीक्षा असेल किंवा इतर अनिवार्य कारणास्तव जर काही कालावधीकरिता गैरहजर राहत असेल, तर अशा विद्यार्थ्यांने प्रशिक्षणाचा आवश्यक कालावधी भरुन काढण्याच्या दृष्टीकोनातून इतर दिवशी जास्तीचा वेळ प्रशिक्षणासाठी दिल्यास व तसे बायोमेट्रिक हजेरीतून प्रतिबिंबीत झाल्यास, त्याची हजेरी परीक्षा परिषदेच्या वतीने ग्राह्य धरण्यात येईल. तथापि संघटनेमार्फत जर ऑनलाइन प्रशिक्षणाचा दावा करण्यात येत असेल, तर त्यास अनुसरून टंकलेखन/लघुलेखन संस्थेमध्ये प्रशिक्षण न घेता बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक डेमो सॉफ्टवेअरच्या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन,बाहेरून परीक्षा देणार्या बहिस्थ विद्यार्थ्यांना देखील संगणक टंकलेखन/लघुलेखन परीक्षेसाठी परवानगी द्यावी असेच संघटनेला अभिप्रेत आहे. संस्थेमध्ये हजेरी न लावता प्रशिक्षण घेणे किंवा बाजारात उपलब्ध असलेल्या डेमो सॉफ्टवेअरच्या माध्यमातून प्रशिक्षण घेणार्या बहिस्थ विद्यार्थ्यांबाबत संघटनेने स्पष्ट भूमिका लिखित स्वरूपात दिल्यास,बहिस्थ विद्यार्थ्यांना टंकलेखन/लघुलेखन परीक्षेसाठी परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

**मुद्दा क्र.**7. बायोमेट्रिक हजेरीबाबत ठेवावयाचा डेटा हा 10 वर्षांचा रद्द करून 2 वर्ष जतन करणेबाबत निर्देश द्यावेत.

- बायोमेट्रिक मशीनद्वारे लावण्यात येणारी हजेरी ही ऑनलाइन स्वरूपात कायमस्वरूपी उपलब्ध असणार आहे. यासाठी वेगळ्याने कोणत्याही स्वरूपाचा खर्च करावा लागणार नाही.काही अनाधिकृत प्रवेश घेणारे संस्थाचालक, संगणक नादुरुस्त झाल्याच्या नावाखाली बायोमॅट्रिक हजेरीचा सुरक्षित केलेला डेटा जाणिवपूर्वक तपासणी अधिकारी यांना उपलब्ध करून देणार नाहीत. हा प्रकार घडू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून, संस्थाचालकांनी दर 15 दिवसांनी सेव्ह केलेला डेटा आपल्या ईमेल पत्त्यावर किंवा पेन ड्राइव, गूगल ड्राइव, Hard Disk इत्यादि माध्यमांमध्ये सुरक्षित करून घ्यावा. तपासणीदरम्यान 10 वर्षाचा हजेरीचा ऑनलाइन पीडीएफ स्वरुपाचा डेटा उपलब्ध करून दिल्यास संपूर्णपणे पारदर्शकता येईल आणि यासाठी वेगळा असा कोणताही खर्च करावा लागणार नाही.

**मुद्दा क्र.**8. गैरप्रकार झालेले सर्व परीक्षा केंद्र तेथील संचालक, आय.टी शिक्षक यांच्यावर कारवाई करण्यात यावी व अशा परीक्षा केंद्रांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

- मागील एका वर्षामध्ये संगमनेर, बीड, चिखली(बुलढाणा), शहादा(नंदुरबार) या परीक्षा केंद्रांवर बोगस विद्यार्थी बसवल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून आय.टी शिक्षक,विद्यार्थ्यांना प्रवेशित करणारे संस्थाचालक

30/10

व उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.तथापि या सर्व प्रकरणांमध्ये स्थानिक आय.टी शिक्षकांसोबत टंकलेखन संस्थाचालकांचेच संगनमत आढळून आलेले असून या गैरप्रकारांमध्ये त्यांचा सहभाग सिद्ध झाल्यास त्यांच्या विरूद्ध देखील गुन्हा दाखल करण्याबाबत संबंधित पोलीस स्टेशन अधिकार्यांना सुचित करण्यात आलेले आहे.

**मुद्दा क्र.**9. ऑनलाइन प्रमाणपत्राबरोबर उत्तीर्ण अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना निकालपत्र देण्याची पद्धत पुढे सुरू करावी.

- ऑनलाइन प्रमाणपत्राबरोबरच उत्तीर्ण-अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची बॅचनिहाय यादी सद्यस्थितीत पूर्वीप्रमाणेच संस्थाचालकांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्र.**10. परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरा फक्त कामकाजाच्या वेळेत चालू राहील.

- सीसीटीव्ही कॅमेरा हे सुरक्षेचे उपकरण असून केवळ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या फायद्याचे नाही. आपल्या संस्थेमध्ये नेमके काय सुरु आहे? किती विद्यार्थी हजर आहेत? हे संस्थाचालकांना कोणत्याही वेळी सहजरीत्या पाहता येऊ शकेल.संस्थेच्या वेळेनंतर संस्थेमध्ये एखाद्या अनाधिकृत व्यक्तीने प्रवेश केल्यास किंवा काही अनुचित प्रकार घडल्यास,त्याचा शोध घेणे संस्थाचालकांना सहज शक्य होणार आहे.त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरा कामकाजाच्या वेळेनंतर सुरू ठेवावा किंवा कसे? हा मुद्दा संस्थाचालकांचा व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आहे.

**मुद्दा क्र.**11. कामकाजानंतर सीसीटीव्ही बंद करण्याची मुभा संस्थाचालकांना असावी.तसेच 24 तासांऐवजी 12 तासांचे फुटेज घेण्यात यावे.

- विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू असताना/ संस्थेचे कामकाज सुरु असताना सीसीटीव्ही बंद ठेवता येणार नाही. कार्यालयीन कामकाजाव्यतिरिक्त इतर वेळेचे सीसीटीव्ही फुटेजची आवश्यकता परीक्षा परिषदेला नाही.

**मुद्दा क्र.**12. परीक्षा केंद्रावर आधारबेस हजेरी किंवा बायोमेट्रिक हजेरी चालू करावी.

- प्रचलित असलेल्या संगणक टंकलेखन परीक्षा एजन्सीसोबत झालेल्या करारनामा मध्ये आधारबेस हजेरी किंवा बायोमेट्रिक हजेरीचा उल्लेख नाही. आधारबेस हजेरी किंवा बायोमेट्रिक हजेरी आणि सीसीटीव्ही कॅमेराची करारनाम्यात सक्ती करावयाची झाल्यास किंवा त्यासाठी स्वतंत्र संस्था नियुक्त करावयाची झाल्यास, प्रति विद्यार्थी किमान रू.125 ते 150/- चा खर्च येईल व पर्यायाने त्यामुळे परीक्षा शुल्कामध्ये देखील वाढ करावी लागेल.परीक्षा केंद्रावरील बायोमेट्रिक हजेरी आणि सीसीटीव्ही कॅमेराच्या अनुषंगाने, वाढीव परीक्षा शुल्क आकारण्याबाबत संघटनेकडून अनुकूल प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर परीक्षा परिषदेकडून आवश्यक निर्णय घेण्यात येईल.तसेही निकटच्या भविष्यात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे परीक्षा केंद्रांमधील प्रत्येक संगणकाला संलग्न असलेल्या वेब कॅमेरामधून परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांचा फोटो घेणे(Face Recognition) व पर्यायाने विद्यार्थ्यांची खात्री करणे शक्य होणार आहे.

**मुद्दा क्र.**13. परीक्षा केंद्राबाबत बैठकीमध्ये सदस्य सुचवतील त्या केंद्राबाबत चर्चा करून निर्णय घ्यावा.

- परीक्षा केंद्राबाबत जिल्हा किंवा तालुका स्तरावर असलेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पॉलिटेक्निक महाविद्यालय किंवा CET/ JEE/ NEET सारख्या प्रतिष्ठित परीक्षा घेणार्या खाजगी संस्थांबाबत सदस्यांकडून किंवा कोणत्याही संस्थाचालकाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर निश्चितच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. मागील एक वर्षामध्ये ज्या-ज्या शहरांमध्ये परीक्षा केंद्र घेण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या, त्या ठिकाणी परीक्षा केंद्र उपलब्ध करवून घेण्याच्या दृष्टिकोनातून परीक्षा परिषदेकडून अनेक संस्थाचालकांसोबत

30/10

चर्चादेखील केलेली आहे. एवढेच नव्हे तर अनेक जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांचेकडून परीक्षेच्या पूर्वी अनेक संस्थाचालकांसोबत चर्चा करण्यात येत असते.

एकंदरीत वरील सर्व मुद्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यभरातील सर्व संस्थाचालकांनी शिक्षणाधिकारी यांच्या दि.14 नोव्हेंबर,2024 रोजीच्या सभेपूर्वी परिपत्रकाची अंमलबजावणी करावी असे आव्हान परीक्षा परिषदेतर्फे करण्यात येत आहे.

30/10/24.

**डॉ.नंदकुमार बेडसे(भा.प्र.से),**
**अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे.**

प्रतिलिपी -

1).**शिक्षणाधिकारी-माध्यमिक(सर्व)** यांनी मुद्दा क्र.5 मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या जिल्ह्यामध्ये दि.13 नोव्हेंबर,2024 अखेर किती संस्थाचालकांनी बायोमेट्रिक मशीन व सीसीटीव्ही लावलेत? याबाबत दि.14 नोव्हेंबर 2024 रोजी जिल्ह्यातील सर्व संस्थाचालकांची सभा घेऊन त्यांच्याकडून लेखी अहवाल घ्यावा व एकत्रित अहवाल परीक्षा परिषदेला सादर करावा.तसेच बायोमेट्रिक मशीन व सीसीटीव्ही न लावणाऱ्या संस्थाचालकांविरुद्ध शिस्तभंग/दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव दि.17 नोव्हेंबर,2024 पर्यंत परीक्षा परिषदेकडे सादर करावा. तसेच मुद्दा क्र.8 मध्ये नमूद केल्यानुसार टंकलेखन परीक्षा सुरु होण्यापूर्वी केंद्र संचालक/आयटी टीचर यांची सभा घेऊन परीक्षा केंद्रांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार खपवून घेतल्या जाणार नाही याची जाणीव करून द्यावी.तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रावरील Unedited CCTV फुटेज परीक्षा झाल्यानंतर संबंधित आयटी टीचर यांनी त्यापुढील तीन महिन्यांकरीता Hard Disk मध्ये सुरक्षित ठेवावा असे देखील सर्व परीक्षा केंद्रांना आपल्या स्तरावरून स्पष्ट करावे.

2).**संस्थाचालक(सर्व)** यांना त्यांचे लॉगिनच्या माध्यमातून माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

3).**प्रोग्रामर**,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांना MSCE वेबसाइटवर सदर पत्रक प्रसिद्ध करण्यास्तव अग्रेषित.